## जिजाऊ जयंती निमित्ताने विविध कार्यक्रम आज

**यवतमाळ** : राजमाता जिजाऊ माँसाहेब यांच्या जयंतीच्या निमित्ताने यवतमाळ शहरात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. छत्रपती सेवा प्रतिष्ठान आणि मराठा सेवा संघाच्या संयुक्त विद्यमाने जिजाऊ जन्मोत्सवाचा उत्सव साजरा करण्यात येणार आहे. हा कार्यक्रम गार्डन रोडवरील शिवतीर्थावर पार पडणार आहे. १२ जानेवारीला सकाळी ९ वाजता या कार्यक्रमाचे उद्घाटन जिजाऊ वंदना आणि अभिवादनाने होणार आहे. दिवसभर विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. सर्व शिवप्रेमींनी, जिजाऊंच्या विचारांना मानणाऱ्या नागरिकांनी या सोहळ्यात सहभागी होऊन उत्सवाची शोभा वाढवावी, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. जिल्हाभरात विविध ठिकाणी जिजाऊ जयंतीनिमित्ताने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

# डिझेलच्या टँकरची केबीन भस्मसात

**यवतमाळ, दि.११, महासागर प्रतिनिधी**: बोरखेडी बुटीबोरी,नागपूर येथून वर्धमान पेट्रोलियम पाटणबोरी ला भारत पेट्रोलियम लिमिटेड चे डिझेल घेऊन निघालेल्या टँकरचालकाच्या केबीनला शॉर्टसर्किटने गुरुवार रात्री १०:४५ ला अचानक आग लागली. स्थानिक ग्रामस्थ व अग्निशमन दलाच्या जवानांनी अथक प्रयत्न करून आगीवर नियंत्रण मिळवले. यात संपूर्ण केबिन व समोरील दोन-चाक जळून खाक झाले यात लाखांचे नुकसान झाले. याबाबत माहिती अशी की, टँकर (एमएच ३१ सी क्यू ७४७९) नागपूर डिझेल घेऊन निघाला होता. गोंडवाकडी गावा जवळ अचानक केबीनमध्ये क्लिनर बाजूस शॉर्टसर्किट होऊन आग लागली. चालक रवींद्र रामदास जायले वय ४९ रा .दहेगाव ता. कळमेश्वर. जी.नागपुर याने सिलिंडरच्या साह्याने आग विझविण्याचा प्रयत्न केला. आगीने रौद्ररूप धारण केल्याने घाबरून चालक पळून गेला. यावेळी टँकरमध्ये २४ हजार लिटर डिझेल होते. केबीनमधील सर्व साहित्य, इंजिन जळून खाक झाले. यात सुमारे लाखांचे नुकसान झाले. डिझेल टाकीचा स्फोट होण्याची शक्यता असताना या घटनेची माहिती स्थानिकांनी पोलिसांना दिली. त्यानंतर पांढरकवडा पोलिस चे पोलिस निरीक्षक दिनेश झांबरे व सहकारी यांनी पांढरकवडा व घाटंजी चे अग्निशमक बंब बोलावले. हैदराबाद व नागपुर रस्त्यावरील वाहतूक ठिकठिकाणी थांबवली होती.पांढरकवडा नगरपालिकेच्या अग्निशमन टँकरमधील सुमित जाधव, प्रीतम बेबडे यांनी धाडसाने एक तास सुरू असलेल्या पेटत्या डिझेलच्या टँकरजवळ जाऊन अग्निशमन बंबाच्या मदतीने आग नियंत्रणात आणली. त्यानंतर घाटंजी नगरपरिषदेच्या अग्निशमन बंबाने त्या टँकरच्या टाकीला थंड करून पुन्हा एकदा सर्व टँकरवर पाणी मारले. वाहने थांबवून संभाव्य धोका टाळण्यासाठी वाहतूक दोन्ही बाजूंनी बंद केल्याने मोठी दुर्घटना टळली आहे. पांढरकवडा पोलिस स्टेशन चे उप पोलीस निरीक्षक देवेंद्र मेशकर, एएसआय संजय रामगडे,पोहेका.राम राठोड, पोहेका. राजू सुरोशे , पोहेका. प्रफुल पावसेकर, नापो का. किशोर आडे, पीसी. राजू मुत्यलवार यांनी घटनास्थळी मदत केली. पोलिस निरीक्षक दीनेश झांबरे तपास करत आहेत.




# त्या अपघातग्रस्त दोघांचाही श्वास थांबला



**यवतमाळ, दि.११, महासागर प्रतिनिधी**: गेल्या मंगळवारला वणी वरून मारेगावाकडे येणाऱ्या दुचाकीस्वार दोन मित्रांचा अपघात होवून गंभीर जखमी झालेल्या दोघांचाही नागपूर येथे उपचारदरम्यान आज शनिवारला पहाटे मृत्यू झाला या तरुणांच्या मृत्यूने पहापळ गावात येथे शोककळा पसरली आहे.

विजय संभाजी थेरे (३५), नितेश खुशाल पायघन (२८) रा. पहापळ असे मृत्यू पावलेल्या युवकांचे नाव आहे. हे दोघेही हिरो होंडा दुचाकी क्रमांक एम एच ३१ एच ३४० ने वणीवरून मागील ७ जानेवारी रोजी रात्री १० वाजताचे दरम्यान मारेगाव मार्गे स्वगावी जाण्यास निघाले. वाटेत निंबाळा राज्य महामार्गावर अपघात झाल्याने दोघेही गंभीर जखमी झाले होते. त्या दोघांनाही पुढील उपचारार्थ नागपूर येथे हलविण्यात आले. मात्र कोमात असलेल्या गंभीर जखमी विजय याने पहाटे अखेरचा श्वास घेतला. काही वेळातच नितीन याचाही मृत्यू झाल्याने दोन तरुण युवकाच्या मृत्यूने पंचक्रोशी हादरली असून पहापळ येथे शोककळा पसरली आहे. परिणामी, विजय थेरे याच्या पश्चात आई, पत्नी व ६ वर्षाची मुलगी आहे तर नितेश पायघन हा अविवाहित होता. नितीन याच्या पश्चात आई वडील व बहीण आहे.

# आरोपी मूंबईतुन घेतले ताब्यात

**यवतमाळ, दि.११, महासागर प्रतिनिधी**: खेळ व क्रिडा सवर्धक मंडळ पंचएका सतरा वर्षीय अल्पवयीन मूलीला फूस लावून घेवून गेलेल्या आरोपीला आर्णी पोलीसांनी मूंबई जावून ताब्यात घेतले ता,१ ऑक्टोंबर २०२४ रोजी अल्पवयीन मूलगी शाळेत जातो म्हणून घरुन गेली होती ती घरी परतली नाही म्हणून वडीलानी ता,३ ऑक्टौंबर २०२४ रोजी आर्णी पोलीस स्टेशनला तक्रार दाखल केली होती,अल्पवयीन मूलगी व आरोपी तरूणाचे मोबाईल लोकेशन मिळत नव्हते कूठलीच माहीती नव्हती ठाणेदार केशव ठाकरे यांनी दोन पोलीस पथक तयार करुन बेपता अल्पवयीन मूलीचा शोध घेणे सुरु केले असता अल्पवयीन मूलीला एका पंचविस वर्षीय तरुणा सोबत ठाणे जिल्हात असल्याची माहीती पोलीस पथकाला मिळताच सहाय्यक पोलीस निरिक्षक प्रशांत देशमूख, जमादार मनोज चव्हाण,रुषीकेश इंगळे,नफीस शेख,नितीन वास्टर,अतूल तांगडे,आकाश गावंडे,या आर्णी च्या पोलीस पथकांनी मुंबई जवळील खोनी ता,कल्याण जि,ठाणे मूंबई येथून ता,८ जानेवारी २०२५ रोजी ताब्यात घेवुन ता,९ जानेवारीला पंचविस वर्षिय आरोपीला अटक केली आरोपीला ता,१० जानेवारीला आर्णी न्यायालयात हजर केले,अल्पवयीन मूलगी व आरोपीचे मोबाईल लोकेशन नाही कोणती ही अधिक माहीती नसताना सूध्दा आर्णी पोलीसानी चाणक्य बूध्दीबळाचा वापर करून अखेर अल्पवयीन मूलीचा शोध लावून आरोपीला अटक करण्याची कौतूकी कामगीरी ठाणेदार केशव ठाकरे,सहाय्यक पोलीस निरिक्षक प्रशांत देशमूख, जमादार मनोज चव्हाण,रुषीकेश इंगळे,नफीस शेख,नितीन वास्टर,अतूल तांगडे,आकाश गावंडे यांनी केली आहे,

## आज पांढरकवडा येथे वक्तृत्व व निबंध स्पर्धा

**पांढरकवडा, दि.११, महासागर प्रतिनिधी**: क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले,राष्ट्रमाता जिजाऊ जयंती उत्सव समिती पांढरकवडा व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले बहुउद्देशिय शैक्षणिक द्वारा अखिल बहुजन समाजाचे मन मस्तिष्क सर्वार्थाने बळकट व्हावे या प्रेरक हेतूने क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती, मुस्लिम शिक्षिका फातीमा शेख यांची जयंती.जिजाऊ आणि युवकांचे आदर्श स्वामी विवेकानंद यांची जयंती १२ जानेवारी यांच्या संयुक्त जयंती महोत्सवाचे आयोजन करण्यात आले. शालेय,महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी वैचारिक व बौध्दिक खाद्य पुरविण्याच्या उद्देशाने ०३ जानेवारी ते ०९ जानेवारी पर्यंत वर्ग ०८ ते ११ व वर्ग १२ ते पदविधर विद्यार्थ्यांकरीता निःशुल्क ऑनलाईन वक्तृत्व स्पर्धा तसेच महिलांकरीता ऑनलाईन निबंध स्पर्धा आयोजीत करण्यात आली होती या स्पर्धेचे बक्षिस वितरण व व्याख्यानाचे आयोजन आज दि.१२ जानेवारी रविवार रोजी संध्याकाळी ०६ ते ०९ पर्यंत वक्ते यांच्या व्याख्यानाचा कार्यक्रम होणार आहे.या कार्यक्रमाचे अध्यक्ष श्रीधर बेले,सल्लागार,केळापूर तालुका तिरळे कुणबी समाज संघटना,उद्घाटक राजुभाऊ मोट्टेमवार,नायब तहसिलदार,प्रमुख उपस्थिती दिनेश झामरे,पोलीस निरिक्षक,पांढरकवडा,प्रमुख उपस्थिती डॉ. प्रिती तोटावार,डॉ. प्रतिभा तोडासे,वैद्यकिय अधिकारी पांढरकवडा,सौ. रेखाताई राजु मोहले,अध्यक्ष अ.भा.माळी महासंघ,सौ. वर्षाताई विजय ठाकरे,अध्यक्ष जिजाऊ ब्रिगेड,सौ.ज्योतीताई श्यामकुवर,मुलनिवासी महिला संघटक,सौ. शशीकलाताई चव्हाण,अध्यक्ष तेली समाज विचार मंच, पांढरकवडा,सौ. नुजहत अफरोज काज़ी जमीलोद्दीन,मुख्याध्यापिका न.प.उर्दू शाळा पांढरकवडा,सौ. प्रणालिका वैभव जिड्डेवार,पेरकी समाज संघटना यांनी केले.

# आर्णी जिनिंगच्या अध्यक्षाविरोधात संचालकांचा अविश्वास ठराव मंजूर



**यवतमाळ, दि.११, महासागर प्रतिनिधी**: आर्णी येथील शेतकरी सहकारी जिनिंग प्रेसिंगच्या अध्यक्षाविरोधात संचालकांनी अविश्वास प्रस्ताव दाखल केला. याच प्रस्तावावर शुक्रवारी मतदान घेण्यात आले. १० संचालकांनी अविश्वास प्रस्तावाच्या बाजूने मतदान केले, तर तीन संचालक प्रस्तावाच्या विरोधात होते. बहुमताने अविश्वास प्रस्ताव मंजूर झाला. त्यामुळे जिनिंगचे अध्यक्ष दिगांबर चंद्रभान बुटले यांना पायउतार व्हावे लागले. अध्यक्षांविरोधात संचालकांनी अविश्वास प्रस्ताव दाखल करताना अध्यक्ष विश्वासात घेत नसल्याचा ठपका ठेवला. तसेच संस्थेतील पदभरती घेतली नाही, असाही आरोप त्यांनी केला. अविश्वास ठरावाच्या बाजूने भूपेंद्र देवराव शिंदे, अमोल मांगूळकर, राजेश कोठारी, नंदकिशोर राठी, महादेव देवकर, सुनील भारती, संजय ठाकरे, संध्या देशमुख, इंदूबाई इंगोले, रमेश इंगोले, आदी संचालकांनी मतदान केले, तर अविश्वास ठरावाच्या विरोधात अध्यक्ष दिगांबर बुटले, श्याम लाड, अक्षय निलावार यांनी मतदान केले. त्यामुळे दहाविरुद्ध तीन अशा मतांनी अविश्वास ठराव मंजूर झाला. ही प्रक्रिया जिल्हा उपनिबंधक नानासाहेब चव्हाण यांच्या मार्गदर्शनात सहायक निबंधक मुकुंद मेश्राम, अध्यासी अधिकारी के. एस. आकोलकर यांनी पार पाडली.

# नायलॉन मांजा विकरणाऱ्यांसह बाळगणाऱ्यांवरही होणार कारवाई

- जिल्हा पोलिस अधीक्षक कुमार चिंता यांची माहिती, संक्रांतीनिमित्त विशेष मोहिम



**यवतमाळ, दि.११, महासागर प्रतिनिधी**: येत्या काही दिवसांवर येवून ठेपलेल्या संक्रांती सणादरम्यान नायलॉन मांजाचा वापर होण्याची किंवा त्याची विक्री होण्याची शक्यता असते. ही बाब लक्षात घेता जिल्हा पोलिस दलाच्या वतीने संपूर्ण जिल्ह्यात नायलॉन मांजाच्या विरुद्ध एक विशेष मोहिम राबवण्यात येणार असून त्यामध्ये हा घातक मांजा विकणाऱ्यांवरच नव्हे तर त्याचा वापर करताना आढळणाऱ्यांवरही कठोर कारवाई करण्यात येणार आहे. त्यामुळे नागरिकांनी नायलॉन मांजा वापरणे टाळून होणाऱ्या कारवाईपासून आपला बचाव करावा असे आवाहन जिल्हा पोलिस अधीक्षक कुमार चिंता यांनी केले आहे.

येत्या १४ जानेवारी रोजी संक्रांत सण सर्वत्र साजरा करण्यात येणार आहे. मात्र गेल्या काही वर्षात पतंग उडवण्यासाठी चायनीज नायलॉन मांजा वापरण्याचे प्रमाण वाढले आहे. नायलॉन मांजा जीवघेणा आहे ही बाब माहिती असतानाही बरेच पालक आपल्या लहान मुलांना नायलॉनचा मांजा घेवून देतात. तो मांजा त्यांच्याही जीवावर उठू शकतो याकडे कुणी लक्ष देत नाही. मात्र आतां नायलॉन मांजा वापरताना दिसणाऱ्या लहान मुलांच्या पालकांवरच कारवाई करण्यात येणार आहे. कारवाईपासून वाचण्यासाठी काळजी घ्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

## अमित शहाविरुद्ध अॅट्रॉसिटीचा गुन्हा दाखल करण्याची मागणी

**उमरखेड, दि.११, महासागर प्रतिनिधी**: संविधानाचे निर्माते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या बाबत एकेरी शब्दात उल्लेख करून त्यांचा अवमान करणारे देशाचे गृहमंत्री अमित शहा यांचे विरुद्ध अॅट्रॉसिटी चा गुन्हा दाखल करावा अशा आशयाचे निवेदन युवक कॉंग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष सोनू खतीब यांनी उपविभागीय पोलीस अधिकाऱ्यांना दिले आहे.

देशाचे गृहमंत्री अमित शहा हे संवैधानिक पदावर असताना त्यांनी देशाच्या राज्यघटनेचे शिल्पकार. भारतरत्न डॉ . बाबासाहेब आंबेडकर यांचे बद्दल संसदेमध्ये एकेरी शब्द वापरत त्यांच्याविषयी अवमानास्पद वक्तव्य केले .त्यांच्या या वक्तव्याने आंबेडकर प्रेमी तसेच तमाम भारतीयांची मने दुखावली आहेत .त्यामुळे त्यांचे विरुद्ध अॅट्रॉसिटी चा गुन्हा दाखल करावा असे आशयाचे निवेदन युवक कॉंग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष सोनू खतीब यांनी जिल्हा पोलीस अधीक्षक यवतमाळ यांना उपविभागीय पोलीस अधिकारी यांचे मार्फत पाठविण्यात आले आहे .

## एचएमपीव्हीचा एकही संशयित रुग्ण नाही

**यवतमाळ** : यवतमाळ : सध्या 'एचएमपीव्ही' या विषाणूचा प्रसार होत असल्याचे चित्र आहे. हा विषाणू धोकादायक नाही हे तज्ज्ञांकडून वारंवार स्पष्ट करण्यात आले आहे. या विषाणूची लक्षणेही न्यूमोनियासारखीच आहेत. तेच उपचार घ्यावे लागतात. सध्या जिल्ह्यात एचएमपीव्हीचा एकही संशयित रुग्ण आढळलेला नाही, एचएमपीव्ही (ह्यूमन मेटान्यूमोव्हायरस) हा विषाणू पसरत आहे. याची लक्षणे ताप, सदर्दी आहेत. सर्दीचा रंग हा लालसर येतो. असा प्रकार आढळल्यास त्या रुग्णाचे नमुने तपासणीसाठी घेतले.

## श्रीमती रजनी अविनाश शिर्के यांना दिल्लीतील प्रजासत्ताक दिनाचे विशेष निमंत्रण



**यवतमाळ, दि.११, महासागर प्रतिनिधी**: रेशीम धाग्याने व्यक्तिचित्र आणि निसर्गचित्र तयार करण्यासाठी देशभरात सुप्रसिद्ध असलेल्या, तसेच दोन वर्षांपूर्वी याच कला कौशल्यासाठी राष्ट्रीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आलेल्या यवतमाळ येथील श्रीमती रजनीताई अविनाश शिर्के यांना दिल्ली येथे होणाऱ्या प्रजासत्ताक दिनाच्या राष्ट्रीय सोहळ्यासाठी विशेष अतिथी म्हणून उपस्थित राहण्याचे निमंत्रण भारत सरकारच्या वतीने प्राप्त झाले आहे. अलीकडेच डिसेंबर महिन्यात त्यांना भारत सरकारच्या वस्त्रोद्योग मंत्रालयाने युरोप येथे, त्यांच्या कलेच्या माध्यमातून भारताचे प्रतिनिधित्व करण्यासाठी, तसेच प्रदर्शन आणि प्रचार-प्रसार करण्यासाठी पाठविले होते. ह्या लुप्तप्राय कलेला पुनरुज्जीवित करण्याबाबत आणि प्रशिक्षणाच्या माध्यमातून ही कला लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी त्यांनी केलेल्या कार्याची फलश्रुती म्हणून केंद्रीय वस्त्रोद्योग मंत्रालयाने त्यांच्या नावाची राष्ट्रीय पुरस्कारासाठी शिफारस केली होती, ज्यासाठी त्यांना राष्ट्रपतींच्या हस्ते विशेष सन्मान प्रदान करण्यात आला होता. या यशामध्ये त्यांचे पती प्रख्यात प्राचार्य स्वर्गीय अविनाश शिर्के यांचा मोलाचा वाटा असून, त्यांनी ह्या कलेचे प्रशिक्षण अनेक विद्यार्थिनींना देऊन, त्यांना उपजीविकेचा नवा मार्ग दाखवला आहे. दिल्ली येथे भारत सरकारने विशेष अतिथी म्हणून प्रजासत्ताक दिनाच्या सोहळ्यात सहभागी होण्यासाठी दिलेल्या निमंत्रणामुळे यवतमाळ शहराच्या नव्हे तर संपूर्ण जिल्ह्याच्या स्त्रीशक्तीला मोठा बहुमान मिळाल्याची भावना सर्वत्र व्यक्त होत आहे.

# वर्षपूर्ती निमित्त पांढरकवड्यात श्रीराम मूर्तिपूजन

**यवतमाळ, दि.११, महासागर प्रतिनिधी**: अयोध्या येथे मर्यादा पुरुषोत्तम प्रभू श्रीराम-सीता मूर्तीच्या प्राणप्रतिष्ठेला वर्ष पूर्ण झाल्याच्या निमित्याने येथील श्रीराम मंदिरात प्रभू श्रीरामाच्या मूर्तीचे पूजन, आरती माजी आ.अण्णासाहेब पारवेकर,सोनू बोरेले यांचे हस्ते करण्यात आले. तसेच यावेळी श्रीराम खिचडीचा प्रसाद वाटप करण्यात आल

आयोध्या येथे मर्यादा पुरुषोत्तम प्रभू श्रीराम च्या बालक रामलाल्लाच्या मूर्तीची गेल्या वर्षी अर्थात पौष शुक्ल द्वादशी म्हणजेच २२ जानेवारी २०२४ रोजी विधिवत प्राणप्रतिष्ठा करण्यात आली होती.त्या सोहळ्याला तिथीनुसार आज तारीख ११ ला एक वर्ष पूर्ण होत आहे.यानिमित्ताने येथील सोनू भैय्या उर्फ आतिश बोरेल यांचे मित्र परिवाराच्यावतीने पांढरकवडा येथील श्रीराम मंदिरात श्रीरामाच्या मूर्तीचे पूजन आरती आणि प्रसाद म्हणून राम खिचडीचे आयोजन करण्यात आले होते भारतीय जनता पार्टीचे नेते माजी आमदार अण्णासाहेब देशमुख पारवेकर व सोनू भैय्या बोरेले यांचे हस्ते येथील श्रीराम मंदिरात पूजन व आरती करण्यात आली.

पूजन व आरती नंतर राम खिचडीचे वाटप करण्यात आले शहरातील श्रीराम मंदिर अष्टभुजा महाकाली मंडळ जवळ सुदर्शन नगर नवशक्ती दुर्गोत्सव मंदिर संतोषी माता मंदिर इंदिरानगर मित्र दुर्गोसो मंडळ एचडीएफसी बँक चौक पत्तीवार हायस्कूल जवळील हनुमान मंदिर के एस शाळेजवळील हनुमान मंदिर डॉक्टर तोडा से यांचे दवाखान्याजवळ संकटमोचन हनुमान मंदिराजवळ तसेच अग्रसेन चौक विक्रांत गणेश मंडळ तहसील चौक आणि जैन चौकात खिचडीचे वाटप करण्यात आले.

यावेळी भाजपाचे तालुकाध्यक्ष आनंद वैद्य शहराध्यक्ष किशोर देशट्टीवार, काशिनाथ मिलमिले, जिनिंगचे अध्यक्ष संभारेड्डी येल्टीवार, प्राध्यापक मंगेश होटे, पांढरकवडा प्रेस क्लबचे अध्यक्ष अशोक बेले, सतीश झाजारिया, सुविधी सुराणा, श्रीराम मंदिराचे अध्यक्ष संजय उपलेंचवार, खरेदी-विक्री संघाचे उपाध्यक्ष निलेश ठाकरे तसेच भारतीय जनता पार्टीचे असंख्य कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने हजर होते

# कामगार सोसायटीचा परवाना रद्द करा

**यवतमाळ, दि.११, महासागर प्रतिनिधी**: आर्णी तालुक्यातील ग्रामपंचायत किन्ही अंतर्गत येत असलेल्या किन्ही, काकडदरा, गवना, चांदापूर व नवनगर येथे मागील २ वर्षांपासून मंत्रालयीन निधी अंतर्गत मंजूर विकासकामे कामगार सोसायटीने केलीच नाही. त्यामुळे सरपंच रवींद्र राठोड यांनी जिल्हाधिकाऱ्यांना सोमवारी दि. ६ जानेवारीला स्मरणपत्र दिले आहे.

न्याय न मिळाल्यास प्रजासत्ताकदिनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषण करण्याचा इशारा दिला आहे. आर्णी तालुक्यातील गट ग्रामपंचायत किन्ही अंतर्गत येत असलेल्या किन्ही, काकडदरा, गवना, चांदापूर व नवनगर येथे मंत्रालयीन निधी अंतर्गत सिमेंट कॉंक्रिट रस्त्यांचे कामे मागील दोन वर्षांपूर्वीच मंजूर झाली होती. या रस्त्याचे काम कालेश्वर कामगार सोसायटी घाटंजी, बोधिसत्व कामगार सोसायटी नेर, गणपती मजूर कामगार सोसायटी आर्णी व परसराम नाईक कामगार सोसायटी आर्णी यांना निविदा प्रक्रियेतून ही विकास कामे मिळाली होती. मात्र, वेळ उलटूनही या कामगार सोसायटीने कामाची सुरुवात न केल्याने संतापलेल्या सरपंच रवींद्र राठोड यांनी २ वर्षांचा कालावधी उलटूनही या कामगार सोसायटीने काम सुरु न. केल्याने त्रस्त सरपंच रवींद्र राठोडे यांनी दि. ६ जानेवारीला जिल्हाधिकाऱ्यांना स्मरणपत्र दिले आहे.

# ना. प्रा.अशोक उईके यांच्या उपस्थितीत अंतरगाव येथे पालक मेळावा



**यवतमाळ, दि.११, महासागर प्रतिनिधी**: कळंब तालुक्यातील शासकीय माध्यमिक आश्रमशाळा अंतरगाव येथे आदिवासी विकास मंत्री प्रा. डॉ.अशोक उईके यांच्या उपस्थितीत पालक मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. आदिवासी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी उत्तम काम करु, असे यावेळी प्रा. उईके म्हणाले. यावेळी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प पांढरकवडाचे प्रकल्प अधिकारी सुहास गाडे, कळंबचे तहसीलदार धीरज स्थूल, गटविकास अधिकारी श्री. बाहेकर, मुख्याध्यापक विजय क्षीरसागर, अंतरगाव सरपंच गुलबानो मेहंदी भाई कोठडीया, डोंगरखर्डा सरपंच निश्चल ठाकरे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष सुनील करपते, सामाजिक कार्यकर्ते निश्चल गौर, आयटीआयच्या प्रकल्प अधिकारी उषा त्रिपाठी उपस्थित होते.याप्रसंगी श्री. उईके यांनी उपस्थित पालकांना विद्यार्थ्यांच्या शिक्षणासंदर्भात मार्गदर्शन केले. शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या कार्याचा आढावा घेऊन आदिवासी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगती संदर्भात ठोस पाऊले उचलण्याच्या दृष्टीने उपस्थितांना आश्वासित केले. त्याचप्रमाणे पालकांच्या अडचणी जाणून घेऊन त्यावर उपाय सुचवले.आपल्या भाषणात श्री.गाडे यांनी उपस्थित विद्यार्थ्यांचे मनोबल वाढावे व पालकांमध्ये शिक्षणाविषयी जागरूकता निर्माण व्हावी याकरिता मार्गदर्शन केले. याप्रसंगी उपस्थितांना अंतरगाव आश्रमशाळेतर्फे निर्मित 'दिशा' ही शॉर्ट फिल्म दाखविण्यात आली. श्री.उईके यांच्या हस्ते फिल्ममध्ये सहभागी कलाकार व तंत्रज्ञ यांचा प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक श्री.शिरसागर यांनी केले. संचलन नीरज जवके यांनी केले तर आभार प्रफुल गावंडे यांनी मानले. यशस्वीतेसाठी उपसरपंच गौरव मडावी, प्रेम आडे, विजय आत्राम, आश्रमशाळेचे धम्मपाल घरडे, किशोर पाटील, सोमेश राऊत, ज्योती नावंदीकर, अधीक्षक सुशील दाढे, अधिक्षिका शुभांगी चव्हाण, प्रणाली सीडाम, श्री. आत्राम, नीलिमा गेडाम, राजू लोणकर, भगवंतराव मेसेवार, चंद्रकला मेश्राम, लक्ष्मण वाढवे, आशिष तायडे यांनी सहकार्य केले.

**नगरपरिषद कार्यालय, उमरखेड (जि. यवतमाळ)**

ISO ९००१: २०१५ Certified Municipal Council

Gmail:-mcumarkhed@gmail.com Office Ph.:-(०७२३१)२३७१३९,२३७१४०

जावक क्रं.- नपउ/पापु/ ५३८/२०२४-२०२५ दिनांक:-१०/०१/२०२५

**जाहीर सुचना**

Nylon Tread Ban Public Notification

**नॉयलॉन मांजा वापर बंदी बाबत**

उमरखेड शहरातील सर्व नागरिकांना / आस्थापना/मार्केट/संघटना/ कार्यालय तसेच व्यक्तीना कळविण्यात येते की, राष्ट्रीय हरीत लवाद (NGT, National Green Tribunal) यांचे आदेश क्र. ३८४/२०१६ व ४४२/२०१६ दि. १४.१२.२०१६ नुसार पर्यावरण संरक्षण अधिनियम १९८६ च्या कलम ५ अन्वये पक्षी व मनुष्यास इजा करनाऱ्या नायलॉन मांजाच्या वाहतूक, विक्री, साठवणुक व वापरणे, याबाबत दोषी आढळल्यास दंडात्मक तथा फौजदारी कारवाहीची तरतूद असून नगर परिषद उमरखेड क्षेत्रात कोणीही नायलॉन मांजाच्या वाहतूक, विक्री, साठवणुक व वापरास प्रतिबंध घालण्यात आले आहे. याबाबत शहरातील नागरीकांनी नोंद घ्यावी. पतंग उडवण्यासाठी, कोणताही तीक्ष्ण धातू, किंवा काचघटक किंवा चिकटपदार्थ किंवा धागा मजबूत करणारा पदार्थ नसलेल्याच केवळ सुती धाग्यास परवानगी असेल. नायलॉन मांजाच्या वाहतुक, विक्रीस, साठवणूक व वापरास प्रतिबंध घालण्याचे निर्देश असून नगर परिषद उमरखेड हद्दीत कोणीही आदेशाचे उलंघन केल्यास दोषीवर दंडात्मक तसेच कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल.

स्वा/-
(श्री. महेशकुमार जामनोर)
मुख्याधिकारी
नगर परिषद उमरखेड

## वाधवाणी कॉलेज ऑफ फार्मसीच्या विद्यार्थ्यांचे सुयश

**यवतमाळ:** येथील पी. वाधवाणी फार्मसी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी आपल्या यशाची परंपरा कायम राखून संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठात आपले स्थान कायम ठेवले. अमरावती विद्यापीठात नुकत्याच पार पडलेल्या उन्हाळी २०२४ परीक्षेत महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कामगिरी करीत गुणवत्ता यादीत स्थान प्राप्त केले. या गुणवत्ता यादीत स्थान प्राप्त करण्यात आलेल्या विद्यार्थ्यांनमध्ये एम फार्म (फार्मास्युटिकल केमेस्ट्री) मध्ये निकिता आवारे यांना प्रथम तर निवृत्ती अढावू यांनी द्वितीय स्थान प्राप्त केले. महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल यशाबद्दल प्राचार्य डॉ. अनिल चांदेवार व सर्व प्राध्यापक वृंदानी विद्यार्थ्यांचे कौतुक केले. सर्व गुणवत्ता प्राप्त विद्यार्थ्यांनी आपल्या यशाचे श्रेय महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अनिल चांदेवार आणि यवतमाळ जिल्हा विकास समितीचे अध्यक्ष जगदिश वाधवाणी तसेच सर्व प्राध्यापक वृंदांना दिले.

# १०वी, १२वी च्या परिक्षा कामकाजावर बहिष्कार टाकण्याचा दिला इशारा

▪ शिक्षण विस्तार अधिकारी संघटनेने दिले शिक्षणाधिकाऱ्यांना विविध मागण्यांचे निवेदन

**यवतमाळ, दि.११, महासागर प्रतिनिधी:** महाराष्ट्र राज्य विस्तार अधिकारी (शिक्षण) या संघटनेने आपल्या विविध मागण्यांचे निवेदन दि.९ जाने २०२५ ला मा.शिक्षणाधिकारी (माध्य.) जि.प.यवतमाळ डॉ.जयश्री राऊत यांना दिले असून तत्कालीन शिक्षण मंत्री यांच्या समक्ष विविध मागण्यांचे निवेदन शिक्षण विस्तार अधिकारी संघटनेने मा.प्रधान सचिव, उपसचिव, महाराष्ट्र राज्य यांच्या उपस्थितीत दिले होते.

शिक्षण विस्तार अधिकाऱ्यांच्या मागण्या रास्त असून तातडीने मार्गी लावाव्या असे निर्देश तत्कालीन शिक्षण मंत्र्यांनी संबंधीत विभागाला दिले होते. तथापी शालेय शिक्षण विभागाकडून विस्तार अधिकारी शिक्षण यांच्या मागण्यांवर दुर्लक्ष केल्याने अद्याप कोणतीही कार्यवाही झाली नाही त्यामुळे राज्यातील संपूर्ण शिक्षण विस्तार अधिकाऱ्यांमध्ये असंतोषाची भावना निर्माण झाली आहे. त्यामुळे नाईलाजास्तव शिक्षण विस्तार अधिकारी संघटनेने फेब्रुवारी-मार्च मध्ये होणाऱ्या १० वी व १२ वी परिक्षेच्या कामकाजावर बहिष्कार टाकण्याचा इशारा या निवेदनाद्वारे देण्यात आला आहे. अशा अशयाचे निवेदन



शिक्षणाधिकाऱ्यामार्फत शालेय शिक्षण विभागाला पाठविले आहे.

यामध्ये विविध मागण्यांचा समावेश आहे. शिक्षण विस्तार अधिकारी हे पद शालेय शिक्षण विभागाकडे वर्ग करुन त्यास सामान्य राज्य सेवा गट-ब अराजपत्रीत सेवामध्ये समाविष्ट करावे, शिक्षण विस्तार अधिकारी हे पद शालेय शिक्षण विभागाकडे वर्ग करावे, कामकाजावर नियंत्रण ठेवण्यासाठी विस्तार अधिकारी पदाचा दर्जा वाढवावा, सामान्य राज्यसेवा गट-ब अराजपत्रीत दर्जाचे शालेय शिक्षण विभागातील असंख्य पदे रिक्त आहेत. त्यामुळे रिक्त पदांची समस्या सुटेल, उपशिक्षणाधिकारी व तत्सम पदाच्या पदोन्नती बाबत उद्भवलेल्या अडचणी दूर होईल, शिक्षण विस्तार अधिकारी यांना वेतनासोबत ८ हजार रुपये प्रवास भत्ता मिळावा, उपशिक्षणाधिकारी व तत्सम पदाच्या पदोन्नती सेवाजेष्ठता यादी तात्काळ अंतीम करावी, श्रेणी-३ या पदावर पदोन्नती झालेल्या शिक्षण विस्तार अधिकाऱ्यांना वेतनवाढ मिळावी, शिक्षण विस्तार अधिकाऱ्यांना विकल्प बदलीची संधी द्यावी. अशा विविध मागण्यांचे निवेदन शिक्षणाधिकारी (माध्य.), जि.प.यवतमाळ यांना देण्यात आल्या.

निवेदन देतेवेळी उपशिक्षणाधिकारी राजू मडावी, मुकेश कोंडावार, श्रीधर कनाके, नलिनी वंजारी, संजय कांबळे, गणेश मैघने, ए.बी.गड्डमवार, मंगेश देशपांडे, अमोल वर्से, दिपीका गुल्हाने, विद्या वैद्य, प्रशांत मस्के, प्रणिता गाढवे, सुरेश राठोड आदि शिक्षण विस्तार अधिकाऱ्यांची उपस्थिती होती.

## » संक्षिप्त...

### मुकूटबन येथे कन्नमवार जयंती साजरी



**झरी जामणी** : महाराष्ट्र राज्याचे दुसरे मुख्यमंत्री कर्मवीर दादासाहेब कन्नमवार यांची १२५ वी जयंती मुकूटबन येथे साजरी करण्यात आली. यावेळी समाजातील सर्व मान्यवरांनी कन्नमवार यांच्या जीवन चरीत्रावर मनोगत व्यक्त केले. यावेळी मुकुटबन ग्राम पंचायत चे सरपंच मीना आरमुरवार, उपसरपंच अनिल कुंटावार, समाजातील जेष्ठ नागरिक बापूराव पुल्लीवार, भुमारेड्डी बाजन्लावार, भुमारेड्डी एनपोतुलवार विलास चिट्टलवार, संजय आगुलवार, मनोज अडपावार, प्रेमकुमार नरडलवार, संजय आकिनवार, गजानन पुल्लीवार, याशिवाय समाजातील सर्व नागरिक उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन संजय आगुलवार, प्रास्ताविक विलास चिट्टलवार तर आभार प्रदर्शन विकास बोरतवार यांनी मानले. युवा कार्यकारणी चे सदस्य भुमन्ना लंकुलवार, अभिनव आकिनवार, प्रज्योत एनपोतुलवार, आकाश बाजन्लावार, प्रदिप अडपावार, श्रीनिवास पुल्लीवार, राहुल बाजन्लावार, राकेश मुत्यलवार, सुरज बाजन्लावार सह युवक व महिलांची उपस्थिती होती.

### ढाणकीच्या उर्दू प्रा. व उच्च मा. शाळेत आनंद मेळावा



**ढाणकी** : विद्यार्थ्यांच्या दैनंदिन जीवनातील मनावरील असलेला अभ्यासक्रमाचा मानसिक ताण तणाव दूर करुन विरंगुळा मिळावा व त्यांच्यातील अंगीकृत सुप्त कलागुणांना वाव देता यावा या उद्देशाने आनंद मेळाव्याचे आयोजन केले.आज शनिवारला पी. एम.श्री जि. प. उर्दू प्राथमिक व उच्च माध्यमिक शाळा ढाणकी येथे आनंद मेळावा साजरा करण्यात आला. यामध्ये विद्यार्थ्यांनी वेगवेगळ्या प्रकारचे खाद्यपदार्थांचे स्टॉल लावले. या मेळाव्याच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना देवाणघेवाण व्यवहार तसेच स्वतः केलेल्या कामाचा आनंद प्रत्यक्ष व सहज घेता आला. काही. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष,शे जमीर,उपाध्यक्ष अस्मा नाहिद सै.जावेद,मोसीन भाई व सर्व सदस्य तसेच मुख्याध्यापक शे.मुद्दशीर मुर्तूजा शे , सहाय्यक शिक्षक सै.अलीम सै.निजाम , मोसीन सर , नजीर सर,साबेर सर व माधव गोरे यांनी अथक परिश्रम घेतले.

### आनंद मेळाव्यात विद्यार्थ्यांनी घेतला सहभाग



**पुसदः** शालेय शिक्षणासोबत व्यावहारिक ज्ञान विद्यार्थ्यांना व्हावे या उदात्त हेतूने शिक्षकांनी आयोजित केलेल्या आनंद मेळाव्यामध्ये विद्यार्थ्यांनी सहभागी होऊन व्यावहारिक ज्ञान घेऊन आपला आनंद उत्सव साजरा केला. शनिवारला हाजी रफीक अहेमद लोहार न. प उर्दू उच्च प्राथमिक शाळा क्रं २ नेहरू वार्ड लोहार लाईन पुसद येथे ११/०१/२०२५ रोजी बालकांचा 'आनंद महोत्सव मेळावा' साजरा करण्यात आला. यामध्ये विद्यार्थ्यांनी वेगवेगळ्या प्रकारचे खाद्यपदार्थांचे स्टॉल लावले होते.

### राज्यस्तरीय टेनिस स्पर्धेसाठी ध्रुवी हुलकेची निवड



**पुसदः** महाराष्ट्र टेनिस असोसिएशन द्वारा ४ जानेवारीला जे.जे. क्लब पुसद येथे अमरावती विभागीय लॉन टेनिस स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यात ध्रुवी हुलके हिने विजय मिळवित राज्यस्तरीय टेनिस स्पर्धेकरिता पात्र ठरली आहे. या अंतिम सामन्यात ध्रुवी हुलके हिने मुलींच्या १७ वर्ष वयोगटाच्या अंतिम सामन्यात वाशीम येथील धनश्री पावडे हिचा ६.० ने एकतर्फी पराभव केला. या विजयामुळे ध्रुवीची नाशिक येथे होणाऱ्या राज्यस्तरीय टेनिस स्पर्धेसाठी अमरावती विभागातून चौथ्यांदा निवड झाली आहे. तिच्या या यशाचे श्रेय ती आई- वडिलांसह जिल्हा टेनिस असोसिएशनचे अध्यक्ष शिव मोर तसेच मार्गदर्शक व कोच गिरीष टोपरे, तसेच अँग्लो हिंदी जुनिअर कॉलेज यवतमाळचे पर्यवेक्षक संजय सातारकर, कोमलसिंह बगेल यांना देते.

### सेवालाल महाराज उत्सव समितीचे गठण

**पांढरकवडाः** उमरी रोड येथील माता जगदंबा देवस्थानात बंजारा नाईक रामलाल राठोड, वासुदेव राठोड, नारायण मेघावत, दिगांबर राठोड, चंद्रशेखर चव्हाण, वसंता चव्हाण यांच्या उपस्थितीत संत सेवालाल उत्सव समिती घोषित करण्यात आली. यावेळी नवनियुक्ती पदाधिकारी व सदस्यांमध्ये विविध विषयावर चर्चाही इझाली. यावेळी अध्यक्षपदी हेमंत राठोड, उपाध्यक्ष दयाल जाधव, सचिव सुरेश आडे, शैलेश चव्हाण, कार्याध्यक्ष सीताराम राठोड, कोषाध्यक्ष संजय जाधव व बंजारा समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## चाचा नेहरू बाल महोत्सवाचे बक्षिस वितरण व समारोप



**यवतमाळ, दि.११, महासागर प्रतिनिधी:** महिला व बालविकास विभागाच्यावतीने येथील दादासाहेब कोल्हे सभागृहात चाचा नेहरू बाल महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. या महोत्सवाचे बक्षिस वितरण व समारोप कार्यक्रम मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे सचिव तथा दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर के.ए.नहार, बाल कल्याण समितीचे अध्यक्ष वासुदेव डायरे, सदस्य अनिल गायकवाड, ॲड.लीना आदे, वनिता शिरफुले, बाल न्याय मंडळाचे सदस्य राजू भगत, ॲड.काजल कावरे, जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी प्रभाकर उपरे उपस्थित होते. तीन दिवसीय बालमहोत्सवात जिल्ह्यातील सर्व बालगृहातील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. बाल महोत्सवावेळी बालकांच्या चेहऱ्यावर मोठा आनंद पहावयास मिळाला. दि.८ जानेवारी रोजी बाल महोत्सवाचे उद्घाटन झाले. उद्घाटनाला यवतमाळ अर्बन को-ऑपरेटीव्ह बँकेचे अध्यक्ष नितीन खर्चे, बाल कल्याण समितीचे अध्यक्ष वासुदेव डायरे तसेच अन्य मान्यवर उपस्थित होते. उद्घाटनानंतर महोत्सवाला सुरुवात झाली. महोत्सवादरम्यान धावणे, गोळा फेक, थाळी फेक, कबड्डी, चित्रकला स्पर्धा, रांगोळी स्पर्धा, वकृत्व स्पर्धा, गायन एकल व सामुहिक, एकल नृत्य, सामुहिक नृत्य आदी स्पर्धा घेण्यात आल्या. मैदानी खेळ नेहरू स्टेडियमच्या मैदानामध्ये घेण्यात आले.

शेवटच्या दिवशी दि.१० जानेवारी समारोप व मान्यवरांच्या हस्ते विजेत्या विद्यार्थ्यांना बक्षीस वितरण करण्यात आले. जिल्हा बाल संरक्षण कक्ष, चाईल्ड हेल्प लाईन १०९८, सखी वन स्टॉप सेंटर आणि जिल्हा महिला व बालविकास कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी यांनी कार्यक्रमाचे उत्तम नियोजन केले होते. हा राज्यातील सर्वात मोठा बालमहोत्सवापैकी एक ठरला. यावेळी बालकांच्या क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या महिला व बाल विकास अधिकारी कार्यालयांतर्गत येणाऱ्या यंत्रणेतील अधिकारी आणि कर्मचारी यांचा सन्मान बाल कल्याण समिती मार्फत करण्यात आला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालयाचे परिविक्षा अधिकारी रविंद्र गजभिये, जिल्हा बाल संरक्षण कक्षाचे लेखापाल स्वप्नील शेटे, सामाजिक कार्यकर्ता आकाश बुर्रेवार यांनी विशेष प्रयत्न केले.

## झरी येथे तालुकास्तरीय कब बुलबुल मेळावा उत्साहात

**यवतमाळ, दि.११, महासागर प्रतिनिधी:** झरी येथे २ ते ३ जानेवारीदरम्यान जय अंबे नगरी वॉर्ड येथे तालुकास्तरीय कब- बुलबुल मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या मेळाव्याचे उद्घाटन आ. संजय देरकर यांच्या हस्ते करण्यात आले. मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी नगराध्यक्ष ज्योती बिजगूनवार, प्रमुख अतिथी गटविकास अधिकारी रवींद्र सांगळे, गटशिक्षणाधिकारी अर्जुन गड्डमवार, उपनगराध्यक्ष ज्ञानेश्वर कोडापे, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष अनिल काटकर, अरविंद धोटे, राम किनाके, रामू मंडाले, विस्तार अधिकारी मोहन



काटकर, नीलेश खैरनार उपस्थित होते. दोन दिवस चाललेल्या या मेळाव्याचे परीक्षण करण्याकरिता पांढरकवडा तालुका कब मास्टर डी. आर. घाटोड, कब मास्टर दीपक पडोळे यांना आमंत्रित करण्यात आले होते. कब बुलबुल मेळाव्यात विविध रंजक खेळ, दोरीच्या गाठी, गाणी, बुक बॅलेंसिंग व लाल फूल उपक्रमांतर्गत शेकोटी आदी उपक्रम घेण्यात आले. सहभागी स्पर्धकांना प्रोत्साहन प्रशस्तीपत्र तर विजयी स्पर्धकांना गौरवचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले. मेळाव्याच्या यशस्वितेकरिता तालुका कबमास्टर विनोद मडावी व तालुका उपकबमास्टर विलास राठोड यांनी परिश्रम घेतले. सदर मेळावा जिल्हा आयुक्त कब बुलबुल कार्यालय यवतमाळ यांच्या मार्गदर्शनात व गटशिक्षणाधिकारी अर्जुन गड्डमवार, विस्तार अधिकारी मोहन काटकर, नीलेश खैरनार यांच्या उपस्थितीत घेण्यात आला. मेळाव्याच्या नियोजनाकरिता गट समन्वयक संतोष मेश्राम यांचे सहकार्य लाभले. याप्रसंगी माजी तालुका कब मास्टर गावंडे यांच्या मागील दशकातील कब बुलबुल उपक्रमातील कार्याची दखल घेत त्यांचा सत्कार करण्यात आला. या मेळाव्यात ५० कब व बुलबुल कब मास्टर यांनी सहभाग नोंदविला.

### बजरंग दल शाखेचे फलक अनावरण

**यवतमाळ** : बाभूळगाव प्रखंडातील बजरंग दल मादणी शाखेच्या फलकाचे आनावरण मान्यवरांच्या हस्ते करीत कार्यकारिणी जाहीर करण्यात आली. यावेळी यवतमाळ जिल्हा सहमंत्री मयूर पिसे, जिल्हा सहसंयोजक कार्तिक निकम, जिल्हा सुरक्षा प्रमुख आकाश शुंगारे, प्रखंड मंत्री विवेक बुरेवार, प्रखंड सहमंत्री सागर सोनवणे, पवन मंडाले, मंगेश रोकडे, अमोल मेहकरे, उत्तम मेहकरे, मंगेश निमसंडे, शुभम लाकडे, रोहन जतकर, मोरेश्वर गेडाम, तेजस बावणे, ललित कैकाडे, गौरव लोखंडे, अनिकेत दोनाडकर, विजय कैकाडे, योगेश मदने, आकाश लांडगे, योगेश मुराली, अनिकेत जांभुरे, देवानंद दराडे, सूरज समृत, गोपाल शेळके, विशाल मदनकर, प्रितम लाकडे, मोहित सहारे, घनश्याम जतकर, योगेश सहारे, जय ठाकरे, मोहित दोडके आदी उपस्थित होते.

## आठवडी बाजारात सेफ झोन निर्माण करा

**यवतमाळ, दि.११, महासागर प्रतिनिधी:** येथील जाजू चौक परिसरातील भाजी, तसेच फळविक्रेत्यांना आठवडी बाजारात स्थानांतरित करण्यात येणार आहे. या ठिकाणी फळ आणि भाजी विक्रेत्यांसाठी सेफ झोन तयार करण्यात यावे, अशी मागणी शहर काँग्रेस कमिटीचे कोषाध्यक्षांसह फळभाजी विक्रेत्यांनी केली आहे.



आठवडी बाजार परिसरात प्रचंड अस्वच्छता आहे. याशिवाय या ठिकाणी दारूची दुकाने आहेत. भाईगिरी मोठ्या प्रमाणात चालते. काही टोळ्यांची दहशत या भागात आहे. मोकाट जनावरे याच ठिकाणी असतात. ट्रकही लागलेले असतात. अशा अस्वच्छ वातावरणात दुर्गंधी मोठ्या प्रमाणात असते. अशा वातावरणात ग्राहक भाजी खरेदी करण्यासाठी फिरकणार नाही. यातून ढकलगाडी विक्रेत्यांवर उपासमार ओढवेल. तत्पूर्वी या भागात पोलिस संरक्षण देऊन सुरक्षा प्रदान करण्यात यावी. हा संपूर्ण भाग सुरक्षित करण्यात यावा. यानंतर फळभाजी विक्रेत्यांना त्या भागात विक्रीसाठी पट्टे पाडून आरक्षित करून द्यावी, अशी मागणी विक्रेत्यांनी केली आहे. या विषयाचे निवेदन ओम तिवारी, नंदू कुडमेथे, जावेद अख्तर, जर्रार खान, जावेद पटेल, सुनील बोरकर, दत्ता हाडके, अरविंद राठोड, त्रिशूल माकोडे, तुळशीदास जवादे, सै. इम्रान सै. लुकमान, खालीद शेख, जीवन मुनेश्वर आदी उपस्थित होते.

### घरकुलाचे अनुदान वाढविण्याची मागणी

**यवतमाळ** : बांधकाम साहित्याच्या दरात वाढ झाल्याने घरकुलाचे अनुदान वाढविण्याची मागणी लाभार्थ्यांकडून होत आहे. गरीब आणि गरजूंना हक्काचा निवारा उपलब्ध व्हावा यासाठी केंद्र व राज्य सरकारकडून विविध घरकुल योजना राबविल्या जातात. यासाठीचा निधी टप्प्या-टप्प्यांनी दिले जाते. दिवसेंदिवस महागाई वाढत असून, बांधकाम साहित्याचे दरही भरमसाठ वाढले आहे. या बाबींचा विचार करता घरकुल अनुदानात वाढ करावी, अशी मागणी लाभार्थ्यांकडून होत आहे.

## सैनिक पब्लिक स्कूल येथे क्रीडा स्पर्धा



**राळेगाव, दि.११, महासागर प्रतिनिधी:** वडकी येथील सैनिक पब्लिक स्कूल ॲण्ड ज्युनिअर कॉलेज येथे एक ते तीन जानेवारदरम्यान क्रीडा सप्ताह तथा वार्षिक स्नेहसंमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी ठाणेदार सुखदेव बोरखडे, सेंट्रल बँक ऑफ इंडियाचे शाखा व्यवस्थापक नरेंद्रन ई.के., सरपंच कलावती कोरडे व डॉ. प्रणाली सायंकर, विशेष अतिथी संस्थेचे अध्यक्ष रणधीरसिंग दूहन, सचिव सत्यवानसिंग दूहन तसेच प्राचार्य सचिन ठमके यांची उपस्थिती होती. यात नर्सरी ते वर्ग बारावीच्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. वार्षिक दोन दिवसीय क्रीडा कार्यक्रमात क्रिकेट स्पर्धा, धाव स्पर्धा, फुकरी स्पर्धा व चेंडू पकड स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकास आणि कलागुणांना वाव मिळावा, यासाठी त्यांना प्रोत्साहन देणे गरजेचे असल्याचे प्रतिपादन शाळेचे अध्यक्ष यांनी केले. ठाणेदार सुखदेव बोरखडे यांनी 'पोस्को कायदा'बाबत मार्गदर्शन केले. तसेच शालेय संगीत कार्यक्रमांचे आयोजनही करण्यात आले होते. या कार्यक्रमाला शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

## राज्यस्तरीय प्रदर्शनासाठी दीक्षा गुरनुलेची निवड

**पांढरकवडा, दि.११, महासागर प्रतिनिधी:** बाबासाहेब देशमुख विद्यालय पहापळ येथील कुमारी दीक्षा तुळशीदास गुरनुले या विद्यार्थिनींनी नुकत्याच पार पडलेल्या विज्ञान प्रदर्शनात सादर केलेला ड्रेनेज मॅनेजमेंट या प्रयोगाने पहिला क्रमांक फटकाविला असून तिच्या या प्रयोगाची राज्यस्तरीय विज्ञान प्रदर्शनाकरिता निवड झाली आहे. नेर येथे नुकतेच जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शन पार पडले या विज्ञान प्रदर्शनात पहापळ येथील बाबासाहेब देशमुख विद्यालयाची विद्यार्थिनी कुमारी दीक्षा तुळशीदास गुरूनुले या विद्यार्थिनीने आदिवासी विभागातून ड्रेनेज मॅनेजमेंट हा प्रयोग सादर केला तिने सादर केलेल्या या प्रयोगाला प्रथम



क्रमांक मिळाला असून तिच्या या प्रयोगाची राज्यस्तराकरता निवड झाली आहे. कुमारी दीक्षा हीने सादर केलेला ड्रेनेज मॅनेजमेंट हा प्रयोग मुंबईसारख्या ठिकाणी दरवर्षी अति पाऊस पडल्याने त्या ठिकाणचे डॅनेज चोकअप होवुन पाणी साचले जाते. त्यावर उपाय सांगणारा प्रयोग म्हणजे कुमारी दीक्षा हीने सादर केलेला ड्रेनेज मॅनेजमेंट होय. या ड्रेनेज मॅनेजमेंट मध्ये नालीच्च्याया तोंडाजवळ स्वयंचलित गटार स्वच्छ करणारे यंत्र बसवले जाते या यंत्रामध्ये आय आर सेंसर,ट्रांजिस्टर आणि डीसी मोटर ची जोडणी केली जाते. अति पाऊस पडल्याने नाली किंवा गटार मध्ये येणारा कचरा नालीच्या मुखाशी असतो. त्यामुळे नाली किंवा गटार बंद होते. मुखाजवळ आलेला कचरा आय आर सेन्सर डिटेक्ट करतो आणि तो मोटार सुरू करण्याचा आदेश देतो. मोटार सुरू झाल्यामुळे पाते फिरते आणि कचरा ड्रेनेजच्या तोंडा जवळून बाजूला काढल्या जातो. त्यामुळे डेनेजचा प्रवाह सुरळीत सुरू राहतो. अशी तिच्या प्रयोगाची संकल्पना आहे.

कुमारी दीक्षा गुरूनले हिच्या प्रयोगाची राज्यस्तरावर निवड झाल्याने पारवा शिक्षण संस्थेचे सचिव अण्णासाहेब पारवेकर यांनी कौतुक केले आहे तसेच संस्था निरीक्षण समितीचे अध्यक्ष अनिस खान, मोरेश्वर सरोदे, सुनील ठाकरे, कुमारी ज्तीज्योती अडपावार, हरिभाऊ कापसे,मुख्याध्यापक संजय चल्लावार, पर्यवेक्षिका कु वंदना नेल्लावार, आणि तिच्या आई-वडिलांनी समाधान व्यक्त केले.आहे.

: आरएनआय रजिष्ट्रेशन क्रमांक :
६६०३२/१९९७
महासागर
मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट.नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, परमार कॉम्पलेस हवालदारपूरा वर्धा - ४४२००१ येथे प्रकाशित केले आहे.
संपादक- श्रीकृष्ण तनसुखदास चांडक, मुख्य कार्यालय मो.नं. ७४४७७३५८५१, ९९२२९७००२३ स्थानिक संपादक नरेंद्र देशमुख मो.९०११०५८३७२ (पी.बी.आय. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांचेवर राहील.

